*कथा क्रमांक १*

# कथा माझी, व्यथाही माझीच!

संध्याकाळची वेळ - पावसाची रिपरिप संपून आता चांगलाच कोसळू लागला होता - हातातल्या पिशव्या सांभाळत तिने चावीने घराचं दार उघडलं आणि धाडकन बंद केलं. ती गच्च ओली झाली असली तरी तिला घाम फुटला होता.कपडे बदलून ती सोफ्यावर डोके धरून बसली. तिला श्वास घ्यायला त्रास होत होता.बेल वाजली अन तिच्या छातीत धडधडू लागले.हात पाय गार पडले.

दरवाजात चावी फिरल्याचा आवाज आला आणि सागर आत आला. दीपालीला बघून सागर घाबरला,

“ काय झाले दिपाली ? एवढी का  घाबरली आहेस ?” सागरला पाहून दिपाली हमसून हमसून रडायला लागली.

“अग बोल ना” दीपालीला जवळ घेत सागर म्हणाला

“ मी स्कूटरने एका माणसाला धडक दिली आणि तो जोरात पडला. ” दिपाली ने रडत रडत सांगितले.

“त्याला लागलं का खूप ? तुला कुठे लागले आहे का? पोलीस आले का? नीट सांग न सगळ”

“पाऊस जोरात होता आणि मला समोरचे काही दिसत नव्हते आणि भेळेची गल्ली आहे त्या कॉर्नरला मी गाडी वळवली आणि हा कोठून आला समोर देव जाणे .बहुतेक तो प्यालेला होता. माझी स्कूटरही पडली मला ही लागले पण तो जोरात उडून गटारीत पडला. मी इतकी घाबरले कि मला काही सुचले नाही, कोणी आजूबाजूला नव्हतं म्हणून मी कशीबशी स्कूटर उचलली आणि वेगात घरी आले.” दीपालीने हाताचे कोपर दाखवले. तिच्या हातावरून रक्ताचा ओघळ वाहत होता.

सागरने तिला शांत करायचा प्रयत्न केला पण मनातून तोही हादरला होता. त्याने आतून फर्स्टएड चा डबा आणला. सावकाश तिची जखम साफ केली आणि अलगद त्यावर मलम लावले. तिला थोपटत तो म्हणाला

“ शांत हो, काही होणार नाही, घाबरू नको, मी पाहून येतो तो माणूस तिथे आहे का ते ”

सागर उठणार तेवढ्यात दिपालीने त्याचा हात गच्च धरला,ती म्हणाली

“नको नको तू तिकडे बिलकुल जाऊ नकोस मला भीती वाटते आहे खूप”

असे म्हणत दिपाली उठली आणि तिचा एकदम तोल गेला. तिचा उजवा पाय सुजला होता आणि तिला उभे राहता येत नव्हते.

‘दिपाली,सांभाळून !” सागर एकदम ओरडला “ दिपाली दुखते आहे का खूप ? चल डॉक्टर कडे जाऊन येऊ”

“ नाही मी कुठेही येणार नाही आणि तू ही कुठे जायचे नाही”

“ वेडी आहेस का ? तुला लागले आहे, तो माणूस अजूनही गटारीतच पडला आहे का ते बघायला पाहिजे,तुला कोणी पाहिले असले तर ? तो सांगेल ना पोलिसांना! त्यापेक्षा आपणच जाऊन पोलीसात तक्रार करू, अग तो प्यालेला असला तर आपण सांगू कि तो एकदम समोर आला स्कूटरच्या. असं काय करतेस ?” सागर समजावत म्हणाला.

“ नाही नाही ,नको प्लीज,प्लीज नको सागर असे काही करू नको ”

“एक काम कर तू एक पेरासिटेमोल घे आधी,आणि हे बघ तू घाबरू नकोस मी सांगेन कि मी स्कूटर चालवत होतो आणि तू मागे बसली होतीस म्हणजे जर काही झालेच तर त्याला मी तोंड देईन . पण मला असे वाटते कि मी बघून यावे.”

तेवढ्यात बेल वाजली...........

घाबरलेली दिपाली अजूनच कावरीबावरी झाली. तिला धीर देत सागरने दरवाजा उघडला आणि शेजारच्या रानडेकाकूंना पाहून त्याला हायसे वाटले. काकू थोड्या चिंताग्रस्त वाटत होत्या. एरवी दिपालीची खूप काळजी करणाऱ्या काकूंचं आज बिथरलेल्या दिपालीकडे लक्षही नव्हतं. कापऱ्या आवाजात काकू सागरला सांगू लागल्या, " सागर, अरे आमचे हे औषध आणायला म्हणून बाहेर गेले ते अजून ही परतले नाहीत रे. एक तास उलटून गेल्यावर थोडी काळजी वाटू लागली म्हणून मी आले. बघून येतोस का रे? कदाचित पाऊस कमी व्हायची वाट बघत दुकानापाशीच उभे असतील."

दिपालीला अशा स्थितीत सोडून जाणं सागरला अवघड वाटत होतं. रानडे काकांना शोधण्याच्या निमित्ताने का होईना, पण सागर भेळेच्या गल्लीपाशी जाऊन येऊ शकत होता. फक्त आणि फक्त याच कारणासाठी दिपालीची समजूत काढून तो बाहेर पडणार इतक्यात समोरच्या घरातली छोटी वृंदा धावत दारापाशी आली आणि सांगू लागली " काकू, काकू, तुमच्याकडे पोलीस आले आहेत." हे ऐकताच दिपालीच्या काळजाचा ठोका चुकला. सागरही या सगळ्या प्रकाराने गोंधळून गेला होता. भिंतीचा आधार घेत घेत काकू दारापाशी आल्या. मागोमाग सागरही तिथे आला. काकूंच्या दिशेने पुढे येत इन्स्पेक्टर जाधवांनी प्रश्न केला, "तुम्हीच मिसेस रानडे का? " पाणावलेल्या डोळ्यांनी सागरकडे बघत, काकूंनी आपला हात आधारासाठी पुढे केला. काकूंचा हात घट्ट धरून सागरने इन्स्पेक्टरना येण्याचं कारण विचारलं. मागे दारातच उभ्या असलेल्या दिपालीचा सागरला अंदाज नव्हता. " इथेच भेळेच्या गल्लीच्या तोंडावर ......." इन्स्पेक्टर जाधवांचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच दिपालीला रडू कोसळलं. आता मात्र सागरच्या पायाखालची जमीनच सरकली. रडत रडतच काकूंच्या खांद्यावर डोकं टेकत दिपाली सांगू लागली, " काकू, मला माफ करा. माझ्या हातून खूप मोठी चूक झाली. आज माझ्यामुळे काका..." आणि दिपालीच्या तोंडातून शब्दच फुटेनासे झाले. काकू मात्र भान हरपल्यामुळे एका जागी निःशब्द उभ्या होत्या.

दिपालीच्या असंबद्धित वक्तव्याने काहीसे विचलित होत इन्स्पेक्टर जाधव सागरला सांगू लागले, " मला माहीत नाही त्या काय बोलत आहेत, पण तासाभरापूर्वीच मिस्टर रानडे भेळेच्या गल्लीच्या तोंडावर चक्कर येऊन पडले. जवळच उभ्या असलेल्या टॅक्सीवाल्याने त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले पण काही मिनिटांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आम्हाला हॉस्पिटलकडून मिळाली."

स्कूटरचा धक्का लागून गटारात पडलेली व्यक्ती रानडेकाका नव्हते, हे दिपालीच्या एव्हाना लक्षात आले होते पण ....

दीपाली तशाच रडवेल्या चेहऱ्याने सगळ्यांकडे पाहताच राहिली. इन्स्पेक्टर जाधवांनी पोलिशी जरबेने प्रश्न विचारला, "ह्याचा काय अर्थ आहे? तुमच्यामुळे काकांना काय?" पण सागर पटकन मदतीला धावून आला. "अहो दीपाली आत्ताच तिथून आली आणि तिने पहिले कि कोणीतरी पडले आहे पण ती मदतीला गेली नाही. आत्ता ती मला तेच सांगत होती की ती मदतीला गेली असती तर बरे झाले असते." हे ऐकून जाधवांची तात्पुरती तर समजून पटल्यासारखी वाटली पण त्यांच्या चेहेऱ्यावरून अजूनही काहीतरी संशय उरला असावा असे वाटत होते.

बाकीचे शेजारीही रानडे काकूंच्या सांत्वनासाठी आले होते. ते पाहून सागर दीपालीला घेऊन घरी आला आणि तिला गरम दूध देऊन झोपवले. मग परत तो रेनकोट घालून तिने उडवलेल्या माणसाला पाहायला बाहेर पडणारच होता, इतक्यात परत बेल वाजली. दार उघडले तर एक माणूस उभा होता. सव्वा पाच फुट उंच, बारीक, सावळा वर्ण अशी ती मूर्ती होती. डोळ्यावर चष्मा होता पण तो तुटलेला होत. केस अस्ताव्यस्त होते आणि कपडे पूर्ण भिजलेले. "कोण पाहिजे?" सागरने वैतागूनच विचारले. "अहो कोण म्हणजे काय त्या स्कूटरवाल्या बाई?" तो चटकन उत्तरला. आवाज सानुनासिक होता आणि एकंदरित घाबरण्यासारखे काहीच नव्हते. "इथे कोणी स्कूटरवाल्या बाई नाहीयेत. आणि तुम्ही कोण आहात?", सागरने परत चिडून उत्तर दिले. पण हा माणूस हसत हसतच म्हणाला "अहो मी दामले. आणि बाई नाहीत कसे म्हणता तुम्ही, मला उडवले नाही का त्यांनी स्कूटरवरून येताना. मगाचपासून त्यांच्याशी एकट्याने बोलेन म्हणतो, पण तेवढ्यात ते इन्स्पेक्टर वगैरे येउन गेले म्हणून मी तिकडे कोपऱ्यात  थांबलो होतो." "कुठल्या कोपऱ्यात, मला कसे दिसला नाहीत? अहो काहीही बोलू नका. माझ्या बायकोने कोणालाही उडवले वगैरे नाहिये."
"अहो मी दिसणार कसा तुम्हाला, आम्हा भुतांना हवे तेवा अदृश्य होता येते ना. अहो त्याचे काय झाले, एव्हडीशी ती स्कूटरची  धडक, फार तर हात पाय मोडतो. पण नशीब पहा कसे असते माझे डोके बरोब्बर गटाराच्या कोपऱ्यावर आपटले आणि तिथल्या तिथे खेळ खलास. अहो…" त्याला वाक्य पूर्ण करू न देताच सागरने घरात खेचले आणि दर लावून घेतले. "हे पहा तुम्ही माझ्या बायकोचा accident पहिला असेल आणि गप्प बसण्याचे काही पैसे वगैरे हवे असतील तर तसे सरळ सांगा, भूत बीत कसले?" पण दामले मात्र शांतच, "फारच हजर जबाबी आहात बुआ तुम्ही, मगाशी त्या इन्स्पेक्टर  साहेबांनाही छान कटवलंत. अहो पण मी एकटा नाहीये, रानडे काकाही आलेत. ते पहा." आता मात्र पूर्णपणे बावरून जायची पाळी सागरची होती कारण खरोखरच दाराची बेल वाजली आणि उघडून पाहतो तर रानडे काका बाहेर उभे. तेही पटकन आत शिरले आणि दामलेच्या शेजारी सोफ्यावर जाऊन बसले. सागर स्तब्ध होऊन पाहताच राहिला.
सागरचा चेहेरा पाहून दामलेच पुढे बोलू लागले. "अहो काय झाले, आमची स्वारी वैकुंठाच्या दाराशी हजर झाली, मागोमाग हे रानडे काका होतेच. तिथे पोचल्यावर कळले की माझ्या मरण्याचा रिपोर्ट अजून पोचला नाहीये, चित्रगुप्त साहेबांचे पी ए म्हणाले की बाईंकडून माफी घेऊन या मगच काय ते करण्यात

येईल. अहो हे तुमचे खालचे बाबू लोक वर पोचल्यापासून लाल फीत फारच वाढल्ये हो वरती. दररोज नवीन नियम काढत असतात म्हणे. माझे तरी ठीक आहे, अहो रानडे काकांनाही तुमच्याकडून माफी घेऊन जावे लागणारे कारण त्यांच्या मरण्याचा तुम्ही तुमच्या खोट्या सबबीमध्ये चुकीचा वापर केलात न तुम्ही. पटकन उठाव पाहू बाईंना."

एव्हाना सागर पूर्णपणे चक्रावून गेला होता .दीपालीच्या हातून अपघात  होतो काय , एक माणूस त्यामुळे गटारात पडतो काय आणि काही तासांनी तो चक्क भूत बनून घरी येतो काय . बर एकटा नाही येत , बरोबर स्वर्गवासी श्री रानडे काकांनाहि सोबत घेऊन य्रतो . हे सगळंच जरा  अनाकलनीय आणि फिल्मी वाटत होतं त्याला . तो त्या दोघांना थांबायला सांगून भामभावलेल्या अवस्थेतच पाणी पिउन येतो म्हणून स्वयंपाकघरात पळाला .हे भूत वगैरे सगळं परीकथेत , गोष्टीत ठीक वाटतं पण आज हे असे दोघे भूत म्हणून चक्क आपल्याच  घरात आलेत !!त्याचं मन मानत नव्हत , ते भूत वगैरे कोणी असतील ह्यावर त्याचा अजिबात विश्वास नव्हता .सत्य काय ते शोधायचंच ह्याच आवेशात तो बाहेर आला . त्याला एक युक्ती सुचली होती . तो रानडे काकांना  म्हणाला , "रानडे काका आत्ता दोन तासांपूर्वीच रानडे काकूंना  mild heart attack येउन गेला , त्यांना हॉस्पिटल मध्ये दाखल करून आत्ताच आलोय तेव्हां काय हवंय तुम्हाला ते पटकन सांगा , जेवून परत काकूंकडे जायचंय ."
हे ऐकल्याबरोबर रानडे काका जगाचे उठले आणि रडायला लागले ..."काय झालं हिला ? कुठे आहे ती ? कोणत्या हॉस्पिटल मध्ये ? मला घेऊन चल तिच्याकडे , चल लवकर आत्ताच्या आत्ता ." एव्हाना ते दामले गृहस्त हि चांगलेच हबकलेले दिसत होते . ह्याच परिस्थितीचा फायदा घेत  सागर , रानडे काकांना  समजावत म्हणाला " अहो काका तुम्ही आता भूत आहात , तुम्हाला कश्या ओळखतील काकू ?". इतका वेळ भूताच सोंग करणाऱ्या काकांना राहवलं नाही .ते लगेच म्हणाले "अरे भूत बित काय घेऊन बसलास , चल आपण जाऊ आधी हॉस्पिटल मध्ये . आताच माझं बोलणं झालं काही तासान पूर्वी तेव्हां बरी होती . असं अचानक काय झालं बुवा एकाएकी ?" रानडे काका चिंतेने जवळ जवळ रडायचेच बाकी होते .त्यांची अवस्था बघून ते दामले हि गोंधळलेले दिसत होते . भूत बनण्याचे आपले नाटक उघडकीस आले म्हणून ओशाळले हि होते . सागरला हि मनातून विचित्र वाटत होतं . आपण चक्क खोटं बोललो ..असो . त्याने काकांना धीर देत सांगितले "अहो काका sorry , पण काकू ठीक आहेत . घरीच आहेत . त्यांना काही झालं नाहीये . तुम्ही हे भूत बनण्याचे सोंग का करताहात हे शोधून काढण्यासाठी मी हि थोडं नाटक केलं ." हे ऐकून काकांचा चेहेरा निवळला . ते थोडे relax झाले पण  गपकन सोफ्यावर बसले . सागर ने त्यांना पाणी आणून दिले . थोडेसे शांत झाल्यावर ते त्यांच्या भुताच्या रोल विषयी सांगू लागले . हे इतकं सारं चालू असताना देखील दिपाली मात्र शांत झोपली होती बेडरूम मध्ये. मगाशी सागर ने दिलेल्या गोळीचा प्रभाव तिच्यावर अजूनही होता .

"दीपालीच्या स्कूटर ने जेव्हां त्या गृहस्ताला उडवले तेव्हा मी तिथेच होतो , medical च्या दुकानात" ..काका सांगू लागले .” दीपालीच्या स्कूटरला धडकून हे गृहस्त खाली गटारात पडले ,तोल जाऊन ,पण दिपाली मात्र ह्यांच्या सारख्या म्हातार्या माणसाचा विचार न करता तडक स्कूटर उचलून पळून गेली .” काका हे सगळे दुकानात उभे राहून बघत होते . दिपाली त्यांच्या शेजारी राहत होती आणि त्यांना ती त्यांच्या मुलीसारखी होती . त्यांना वाईट वाटले. तिचे हे असे वागणे त्यांना अयोग्य वाटले . दामले गरीब होते , वयस्कर होते म्हणून त्यांनी complaint वगैरे  केली नाही ,हेच जर दुसरा कोणी असता तर त्याने नक्कीच पोलिसात तक्रार केली असती .काकांनी  दीपालीला थोडीशी समज द्यायचे

ठरवले , एक  नागरिक म्हणून आपल्या कर्तव्याची जाणीव करून द्यायचे ठरवले .सागरला खरं तर सांगावस वाटत होतं कि ती घाबरून पळून आली , बेफिकीर होती म्हणून नव्हे पण काका बोलतच राहिले .

दुकानातून एका बाटलीत  पाणी घेत ते त्या गृहस्तानपाशी आले आणि त्यांना उठवत त्याने त्यांचे हात तोंड धुवायला पाणी दिले . प्यायला हि थोडे पाणी दिले . ते गृहस्त होते दामले . तिथे जवळच राहत होते आणि एकटेच होते . एक मुलगा होता . तो हि शहराबाहेर नोकरी निमित्त आणि बायको आजारी , बिछान्याला खिळलेली . तिच्याच साठी औषध आणायला जात असताना हा अपघात घडला . आज ते तसेच पडून राहिले असते तर त्यांच्या बायकोला कळले हि नसते कुठे गेले दामले. बिचारी वांट बघत बसली असती दाम्ल्यांची . ह्याच गोष्टीची काकांना दीपालीला जाणीव करून द्यायची होती . कोणाच्या घरची परिस्थिती कशी असेल काय माहिती . असं पळून जाऊन कस चालेल ?दामले अजून उठू शकत नव्हते .आणि रानडे काकांना त्यांना उठवणे झेपत नव्हते .तितक्यात एक पोलिस इन्स्पेक्टर तिथून गाडीवरून जात असताना त्याने काकांची धांदल पाहून गाडी थांबवली , दामल्यांना उठवले , त्यांना कुठे लागले का ते बघितले आणि समोरच्याच दवाखान्यात घेऊन गेले . तेव्हांच काकांच्या डोक्यात हा भुताचा प्लान आला आणि त्याने त्या इन्स्पेक्टर ला हि आपल्या नाटकात सामील होण्यास विनंती केली . नुकतीच duty संपवून घरी जात असणारे हे  इन्स्पेक्टर हि ह्या नाटकात सामील होण्यास लगेच तयार झाले. ह्या नाटक मूळे कोणाला काही बोध द्यायचा असेल तर का नाही असा त्यांनी हि विचार केला. असं ठरलं कि पोलिस रानडे काकूंना काकांच्या अपघाताची बातमी देणार  .काकांनी काकूंना आधीच ह्या नाटकाची कल्पना दिली होती . काकुंनीही सगळं  timing अगदी  perfect manage केलं . आणि हे सगळं नाटक ठरलं. त्या प्रमाणे दामले आणि रानडे काका भूत बनून दीपालीच्या घरी आले . दिपाली रानडे काकांची शेजारी त्यामुळे तिचा पत्ता मिळायला काहीच अवघड नव्हतं . "ohh तर हे असं आहे सगळं !!" सागर म्हणाला .आता पुढे काय ?सागरला तर त्यांचे हे गुपित कळले होते . त्याला आठवलं तो दीपालीला किती सांगत होता कि भेल वाल्याच्या गल्ली पाशी जाऊन बघून येतो पण ती काही तयार होईना . सागरने थोडा विचार केला आणि काकांना म्हणाला "काका आपण हे नाटक असंच पुढे नेऊ . पूर्ण करू . दीपालीला तिच्या कर्तव्याची जाणीव करून देऊ “ .तोही आता  ह्या नाटकात सामील होता. दीपालीला उठवायला तो आत गेला .

दिपालीला उठवायला तो आत गेला, पण तसाच बाहेर आला. रानडे काका आणि दामले काका त्याची वाट पाहत होते. त्या दोघांना उद्देशून तो म्हणाला "मला वाटंत हे भूतबित प्रकरण जाउद्या. दिपालीला ते अजिबात पटणार नाही. तिची चूक झालीय हे पटवून देण्यासाठी दुसरीच एखादी शक्कल लढवावी लागणार आहे"

रानडे काका म्हणाले, "अस पहा, दीपालीने दामल्यांना नीट पाहिलं नाहीये. जर तिला आपण सांगितले की या गृहस्थांनी अपघात पाहिलाय, तर बघू काय रियाक्शन होतेय तिची."

पावलांचाआवाज आला म्हणून सागरने वळून पाहिले तो दिपाली लंगडत हळूहळू चालत येत होती. पटकन उठून सागरने तिचा हात धरून तिला हलकेच खुर्चीवर बसवले. दिपालीने रानड्यांना व दामल्यांना नमस्कार केला, पण दुसऱ्याच क्षणी ती दचकली.

"सागर, हे.. हे.. हे.. रानडे काका… ते इन्स्पेक्टर तर म्हणाले ....... ", दिपाली बोलत असताना सागरने अडवले. " दिपू, इट इज ए लॉग स्टोरी. नंतर सांगीन सगळ. आत्ता आपली प्रायोरिटी वेगळी आहे", सागर म्हणाला. हाताच्या इशाऱ्याने सागराला थांबवत दिपाली म्हणाली, " सागर, माझी प्रायोरिटी या क्षणी आहे ती म्हणजे मला पोलिस चौकी वर जायचंय, न काय खर घडलंय ते सांगायचय." सगळे तिच्याकडे पाहताच राहिले. "एकूण तिला आपली चूक समजलीय", सागरच्या मनात आल.

पण उघडपणे तो म्हणाला, " पोलिसाकडे जावून गुन्हा कबूल करण केन्वाही चांगलंच. पण त्याच्या परिणामांचा विचार केलास का? तारखांवर तारखा पडत रहातात ..." दिपाली शांतपणे म्हणाली, "कल्पना आहे मला. मला दंड होईल, कदाचित जेल मध्ये जावे लागेल. सलमान खान ने एकाला फुटपाथवरून उडवले, त्याची केस वर्षानुवर्षे चालू आहे. सलमान खान ला काही शिक्षा नाही होत; मूव्हीजमध्ये काम व्यवस्थित चालू आहेत त्याची. कारण तो सलमान आहे. मी सामान्य नागरिक आहे. मला शिक्षा ठोकायला त्यांना वेळ लागणार नाही; याचीही मला जाणीव आहे. पण एकाच विचार केला मी, सागर. अरे माझ्या बाबांना कोणी अस धक्का देवून , अजाणतेपणे का होईना, निघून गेल असत  तर माझी किती तडफड झाली असती?", दिपाली रडायला लागलि. इतक्या वेळ बघ्याची भूमिका घेणारे दामले उठले आणि दिपालीजवळ गेले. तिच्या खांद्यावर हात ठेवून तिला आष्वासक स्वरात म्हणाले, " समाज, तू धडक दिलेल्या माणसाने तक्रार नाही केली तर?" दिपाली गोंधळलेल्या नजरेने दामाल्यांकडे बघत राहिली. दामले पुढे म्हणाले, "तू ज्याला धडक दिलीस तो माणूस मी आहे. तू मुद्दाम काहीच केल नाहीस. पाऊस मुसळधार होता, धुकही होत, रस्ता सुद्धा निसरडा झाला होता. तुझी स्कूटर घसरून माझ्यावर पडली. अपघात होता तो. गुन्हा नव्हता. तरी तू घाबरलीस आणि गडबडीने निघून गेलीस. बेपर्वा होतीस म्हणून नाही. म्हणून मी ठरवलंय तक्रार नोंदवणार नाही". दिपाली दामल्यांच्या प्रेमळ आवाजाने भारावली होती. पण काय बोलाव, सुचेना तिला.

रानडे काका हसत म्हणाले, " हे सगळ तुम्ही ठरवलं होत, तर तो इन्स्पेक्टर, भूताच नाटक, असला तमाशा करायची की जरुरी होती?"

दामले हसले. पण पुढच्याच क्षणी गंभीर होत म्हणाले, " मला त्या स्कूटर वाल्या बाईला धडा शिकवायची इच्छा होती. मागून जोरात ती धडकली, मी तोंडावर पडलो; त्या गोंधळात तिचा चेहरा नीट दिसला नाही. पण आत्ता इथे दीपालीला रडवेल्या चेहऱ्याने आपली चूक कबूल करताना बघितले न माझा जीव कळवळला. तिच्या जागी मला माझी मुलगी दिसली. अहो, माझ्याच मुली विरुद्ध कशी तक्रार करू मी? आणि हो, सागर, तू आम्हाला गप्प बसायचे पैसे देऊ करत होतस. चालला लाच. ती सुद्धा आमच्या सारख्या अण्णा हजारेंच्या भक्तांना?"

चौघहि हसले. रानडे काका म्हणाले, दिपू, या सगळ्या रामायणावर तू एक कथा लिही. पाठवून दे एखाद्या कथा स्पर्धेसाठी.